# महाराष्ट्र वस्तु व सेवाकर विभाग

विशेष राज्यकर आयुक्त महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालय, ३ रा मजला, नवीन इमारत,
वस्तु व सेवाकर भवन, माझगांव, मुंबई - ४०० ०१०.

वाचा: - १. वित्त विभाग शासन निर्णय क्र. विकवि-१२११/प्र.क्र.२९१/ वि.प्र-४ मुंबई, दिनांक १८/११/२०११

२. या कार्यालयाचे आदेश क्र. अविआ / म.रा. / कार्यालय निहाय पदे / पुनर्रचना कक्ष / प्र.क्र.५८/ ब-३७८ मुंबई, दि. ०१/१२/२०११.

३. वित्त विभाग शासन निर्णय क्र. विकआ-१०११/प्र.क्र. ३६१/ वि.प्र-४ मुंबई, दिनांक १०/१/२०१२

४. या कार्यालयाचे आदेश क्र. अविआ / म.रा. / कार्यालय निहाय पदे / पुनर्रचना कक्ष / प्र.क्र.५८/ ब- ४०० मुंबई, दि. ११/०१/२०१२.

५. वित्त विभाग शा. नि.क्र विकआ-१०१४ / प्र.क्र. १६७ / वि.प्र. ४ / दि. ०९/०५/२०१४

६. या कार्यालयाचा आ. क्र. विविआ/म.रा./कार्या. निहायपदे/गट-ड व इतर संवर्ग/ प्र.क्र. १,ब- ५६ दि. २४/०६/२०१४.

७. या कार्यालयाचा आदेश क्र. विविआ / म.रा. / पुनर्रचना कक्ष/ प्र.क्र. ८८, दि. ०८/०७/२०१६ व दि. २१/०७/२०१६

८. या कार्यालयाचा आदेश क्र. विविआ/ आस्था -३/ पुनर्रचना कक्ष/ कार्या. स्थाना. / प्र.क्र. ८७, दि. ०९/०५/२०१७.

९. या कार्यालयाचा आदेश. क्र. विविआ/ आस्था -३/ पुनर्रचना कक्ष/ कार्या. स्थाना. / प्र.क्र. ८७, दि. १९/०५/२०१७.

१०.या कार्यालयाचा आदेश क्र. विविआ/ आस्था -३/ पुनर्रचना कक्ष/ कार्या. स्थाना. / प्र.क्र. ८७, दि. १९/०६/२०१७.

११. वित्त विभाग शासन निर्णय क्र. विकवि-१२१८ / प्र.क्र. ६८ / वि.प्र. ४, दि. १३/०४/२०१८

## कार्यालयीन आदेश

**विषय:- प्रशासकीय कारणास्तव राज्यकर अधिकारी, राज्यकर निरीक्षक व कर सहायक या पदांचे एका कार्यालयातुन दुसऱ्या कार्यालयात स्थानांतरण करणेबाबत.**

क्रमांक विविआ/ आस्था -३/ पुनर्रचना कक्ष/ कार्या. स्थाना. / प्र.क्र. ८७ मुंबई दिनांक 19 APR 2018

दिनांक ०१/०१/२०१६ पासून कार्यनिहाय ऐवजी भौगोलीक कार्यपध्दती अंमलात आणतांना खात्याची फेररचना (Restructuring) करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे दि. ०१.०७.२०१७ पासून वस्तू व सेवा कर कायदा अंमलात आला आहे. वस्तू व सेवा कर कायद्यांतर्गत केंद्र व राज्य यांच्यामध्ये राज्यातील व्यापाऱ्यांचे वाटप झाले असून, सध्या वस्तू व सेवा कर कायद्यांतर्गत ९१०२१४ व्यापारी राज्याकडे आहेत. त्यामुळे राज्यकर विभागातील अधिकाऱ्यांना मूल्यवर्धित कर कायदा २००२ अंतर्गत प्रलंबित असलेल्या कामांबरोबरच वस्तू व सेवा कर कायद्यांतर्गत काम करावे लागत आहे. या सर्व कामाचा आढावा घेतला असता, काही कार्यालयातील राज्यकर अधिकारी या पदांचे महसूल वाढीच्या दृष्टीने तसेच कामातील असमानता दूर व्हावी या दृष्टीने दुसऱ्या कार्यालयात स्थानांतरण करणे आवश्यक आहे असे दिसून आले आहे.

त्यानुसार खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे एका कार्यालयातून दुसऱ्या कार्यालयात अधिकाऱ्यांची पदे स्थानांतरीत करताना, त्यासोबत प्रति अधिकारी २ विक्रीकर निरीक्षक व १ कर सहायक यांची पदे देखिल स्थानांतरीत करण्यात येत आहेत.

| अ.क्र | ज्या कार्यालयातून पदे स्थानांतरीत करावयाची आहेत ते कार्यालय व पदे | | | | ज्या कार्यालयात पदे स्थानांतरीत करावयाची आहेत ते कार्यालय व पदे | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | कार्यालय | रा. अ. | रा.नि. | क.स. | कार्यालय | रा. अ. | रा.नि. | क.स. |
| १ | २ | ३अ | ३ब | ३क | ४ | ४अ | ४ब | ४क |
| १ | पालघर | ३ | ६ | ३ | रायगड | ३ | ६ | ३ |
| २ | भाईंदर | ५ | १० | ५ | रायगड | ५ | १० | ५ |
| ३ | सोलापूर | ४ | ८ | ४ | पुणे | ४ | ८ | ४ |

| अ.क्र | ज्या कार्यालयातून पदे स्थानांतरीत करावयाची आहेत ते कार्यालय व पदे | | | | ज्या कार्यालयात पदे स्थानांतरीत करावयाची आहेत ते कार्यालय व पदे | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | कार्यालय | रा. अ. | रा.नि. | क.स. | कार्यालय | रा. अ. | रा.नि. | क.स. |
| ४ | उस्मानाबाद | २ | ४ | २ | अहमदनगर | २ | ४ | २ |
| ५ | कोल्हापुर | ७ | १४ | ७ | मुंबई | ७ | १४ | ७ |
| ६ | धुळे | २ | ४ | २ | अहमदनगर | २ | ४ | २ |
| ७ | जळगांव | ४ | ८ | ४ | औरंगाबाद | ४ | ८ | ४ |
| ८ | नंदुरबार | २ | ४ | २ | जालना | २ | ४ | २ |
| ९ | नांदेड | ३ | ६ | ३ | लातूर | ३ | ६ | ३ |
| १० | नांदेड | ३ | ६ | ३ | पुणे | ३ | ६ | ३ |
| ११ | हिंगोली | २ | ४ | २ | पुणे | २ | ४ | २ |
| १२ | नागपूर | १० | २० | १० | पुणे | १० | २० | १० |
| १३ | अमरावती | २ | ४ | २ | खांमगांव | २ | ४ | २ |
| १४ | अमरावती | ६ | १२ | ६ | पुणे | ६ | १२ | ६ |
| १५ | यवतमाळ | २ | ४ | २ | पुणे | २ | ४ | २ |
| १६ | अकोला | २ | ४ | २ | पुणे | २ | ४ | २ |
| | **एकूण** | **५९** | **११८** | **५९** | | **५९** | **११८** | **५९** |

या आदेशान्वये जी विशिष्ठ पदे स्थानांतरीत होणार आहेत त्या पदांच्या महाविकास सांकेतांकासह व त्यासंबंधी करावयाच्या कार्यवाहीचे निर्देश असलेला आदेश स्वतंत्रपणे पारीत करण्यात येईल.

संदर्भ क्र. ११ मधील शासन निर्णयानुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन हा आदेश निर्गमित करण्यात येत आहे. या आदेशाची अंमलबजावणी दि. **०१ जुन, २०१८** पासून करण्यात येईत याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

(राजीव जलोटा)
राज्यकर आयुक्त
महाराष्ट्र राज्य

प्रत सादर,

१. मा. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)
३. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महराष्ट्र-१ मुंबई
५. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-२, मुंबई
६. सचिव (वित्त सुधारण), मंत्रालय, मुंबई
७. उपसचिव, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई

<u>प्रत रवाना:</u>

१. सर्व अपर राज्यकर आयुक्त
२. सर्व राज्यकर सहआयुक्त
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
४. सर्व आहरण व संवितरण अधिकारी
५. राज्यकर उपआयुक्त, जनसंपर्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. कार्यासन अधिकारी, आस्थापना २/३/४/५/६ आयुक्तांचे कार्यालय मुंबई
७. सर्व जिल्हा कोषागारे
८. निवडनस्ती
९. स्थळ प्रत.